1.


शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

विद्वत्प्रमाणित, यू.जी.सी. मान्यताप्राप्त त्रैमासिक

(Peer Reviewed Referred Research Journal)


ISSN No. 2319-6025


# शिविम संशोधन पत्रिका


वर्ष-नववे : जोडअंक-एकवीस आणि बावीस : जानेवारी ते जून २०२०


# मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील विविध संप्रदाय

दिनांक १ व २ फेब्रुवारी, २०२०




Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
★ Aundh, Pune-67 ★


## सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड

(स्वायत्त महाविद्यालय)

ता. कराड जि. सातारा

राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (रुसा)

179


Scanned with CamScanner

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed refered Research Journal - ISSN No. 2319-6025)]
( विद्यापीठ अनुदान अयोग नवी दिल्ली, मान्यता अ.क्र. ६४१७५ )

## सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा)
वर्षे नववे : अंक एकवीस - बावीस
जानेवारी - फेब्रुवारी - मार्च - एप्रिल - मे - जून २०२०

## मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील विविध संप्रदाय

**संपादक**
डॉ. शिवकुमार सोनाळकर

**अतिथी संपादक**
डॉ. मोहन राजमाने,
प्राचार्य, स.गा.म. कॉलेज, कराड
डॉ. रेश्मा दिवेकर प्रा. डॉ. रमेश पोळ

**कार्यकारी संपादक**
डॉ. नीला जोशी

**संपादक मंडळ**
डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. गोमटेश्वर पाटील, डॉ. तातोबा बदामे, डॉ. दिनेश बाघुंबरे

**सल्लागार समिती**
डॉ. राजन गवस, डॉ. प्रकाश कुंभार, डॉ. डी. ए. देसाई, डॉ. अनिल गवळी

**प्रकाशक**
अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर
अनुराज, ७/ब, सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर ४१५०११

**मुद्रक**
श्रीधर मुद्रणालय, कराड
३३८, सोमवार पेठ, कराड ४१५११०
मोबा. ९८९०४९८४९७

**मूल्य : ३००/-**

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

ही संशोधन पत्रिका प्रकाशक डॉ. शिवकुमार सोनाळकर यांनी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यासाठी श्रीधर मुद्रणालय, कराड येथे छापून अनुराज, ७/ब, सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर ४१५०११ येथे प्रकाशित केली. या पत्रिकेत प्रकट झालेल्या मताशी संपादक, प्रकाशक, सल्लागार व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

180



Scanned with CamScanner

# * अंतरंग *


* मध्ययुगीन मराठा कालखंडातील सामाजिक परिस्थिती.
  डॉ. अभय पाटील. १
* मध्ययुगीन मराठी संप्रदायातील कवितेची निर्मिती आणि रूपविशेष
  डॉ. वामन सरगर २
* मुस्लिम संतांच्या काव्यरचनेतील गुरुमहात्म्य
  प्रा. लता ऐवळे ८
* मध्ययुगीन कालखंडातील भक्ती परंपरेचे स्वरूप
  डॉ. प्रियांका कुंभार १२
* मध्ययुगीन मराठी साहित्यातील नवविधा भक्ती
  अमृता थिटे १६
* मध्ययुगीन संतवाङ्मय प्रवाह आणि स्त्रीसंतांचे स्थान
  डॉ.शीतल गोर्डे-पाटील २०
* मध्ययुगीन वाङ्मयातील मराठीचा भाषाभिमान
  डॉ. प्रकाश दुकळे २४
* मध्ययुगीन मराठी संप्रदायातील गुप्त बोलीचे स्वरूप
  श्री. अनंता कस्तुरे २८
* मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील मराठी संतांच्या हिंदी भाषेतील रचना - उद्देश व स्वरुप
  डॉ. सुजय पाटील ३२
* महानुभाव संप्रदायातील दुर्लक्षित प्रैलू
  डॉ. भरत जाधव ३६
* महानुभावीय संप्रदाय : एक आढावा
  डॉ. बबन गायकवाड, ४०
* ''मध्ययुगीन मराठीतील महानुभाव संप्रदायाचे वाङ्मयीन योगदान''
  सुरेखा व्हसमने ४४
* महानुभावांची मातृसंकल्पना
  विश्रांती कांबळे ४८
* महानुभावियांचे तत्त्वज्ञान : जीव, देवता, प्रपंच आणि परमेश्वर
  श्री. प्रविणसिंह शिलेदार ५१
* महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान व आचारधर्म
  डॉ. लता मोरे ५४
* मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील महानुभाव संप्रदाय
  प्रा. संभाजी कदम ५८
* 'महानुभाव पंथ साहित्य सरिता'
  सौ.शुभांगी कुंभार ६२
* 'महानुभाव संप्रदाय आणि वारकरी संप्रदाय यातील साम्यभेद'
  प्रा.सौ.शैला माने ६६


Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh, Pune

181

ISSN No. 2319-6025



Scanned with CamScanner

* वीरशैव संप्रदाय आणि श्रीबसवेश्वरांचे कार्य
डॉ.सुभाष जाधव ४०७
* लिंगायत धर्माचे तत्त्वज्ञान
डॉ. मांतेश हिरेमठ ४११
* युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वरांचे प्रेरणादायी वचन साहित्य
संगीता आरळी ४१६
* महात्मा बसवेश्वरांच्या बसववचनातील स्त्रीविषयक जाणिवा
प्राचार्य डॉ.शिवलिंग मेनकुदळे ४२०
* शिवशरणी अक्कमहादेवी यांच्या वचनसाहित्यातील विचारतत्त्वे
डॉ. दत्ता पाटील ४२३
* मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील समर्थ संप्रदायाचे अवलोकन
डॉ. शिवाजी पाटील ४२७
* समर्थ संप्रदाय
डॉ. शर्मिला घाटगे ४३०
* समर्थ संप्रदाय
प्रा.महेश कुलकर्णी ४३४
* रामदासांचा समर्थ संप्रदाय
डॉ. वैशाली औताडे ४३७
* समर्थ संप्रदाय: तत्त्वज्ञान आणि वाङ्मय
प्रा.अंकुश घुले ४४०
* मनाच्या आरोग्यासाठी मनाचे श्लोक
डॉ.संग्राम थोरात ४४४
* रामदासांची लोकशिक्षकाची भूमिका
डॉ. सविता माळी ४४७
* वेणाबाई ते वेणास्वामी
डॉ. रेश्मा दिवेकर ४५२
* गुरू नानकदेवजींचा पुरोगामी दृष्टीकोन
डॉ.सुभाष वाघमारे ४५६
* मुस्लिम आणि ख्रिस्ती संतांचे योगदान
डॉ. बाळासाहेब चव्हाण ४६१
* 'मुडलगी संप्रदायातील मराठी संत कवयित्री– राधाबाई'
डॉ. धनंजय होनमाने ४६६
* चिमड संप्रदायाच्या प्रचार व प्रसारासाठी साहित्यसंपदेचे योगदान
नारायण आपटे, ४६९
* नागेश संप्रदाय आणि अज्ञानसिद्धांच्या साहित्यातील समाज–संस्कृती दर्शन
डॉ. देवीदास गायकवाड ४७२
* आनंदसंप्रदाय आणि त्यांचे वाङ्मय
डॉ. बाळकृष्ण शिंदे ४७६

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya
Aundh Pune-67



182

# महात्मा बसवेश्वरांच्या बसववचनातील स्त्रीविषयक जाणिवा

प्राचार्य डॉ.शिवलिंग मेनकुदळे
डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, औंध, पुणे

संत बसवेश्वर एक द्रष्टे सुधारक होते. आपल्या समाज परिवर्तनाच्या विचारांचा प्रसार आणि समाजाच्या कल्याणकारी योजना प्रत्यक्ष राबविण्यासाठी त्यांनी आपले जीवन समर्पित केले. आपल्या सामाजिक व धार्मिक व्यवस्थेची रचना करताना समाजात अस्तित्वात असणाऱ्या बंडखोर सांस्कृतिक परंपरांचा त्यांनी आधार घेतला. संत बसवेश्वराने श्रमप्रतिष्ठा हे सर्व श्रेष्ठ मूल्य मानले, उद्योगातील श्रेणी पध्दतीवर प्रहार केला. मजूर किंवा श्रमिक आणि बुध्दिवंत यांना माणूस म्हणून समान दर्जाची वागणूक दिली. श्रम हीच पूजा ही संकल्पना अधिक दृष्ढ करण्यासाठी त्यांनी आपले जीवन समर्पित केले. समाजात अस्तित्वात असणाऱ्या बुरसटलेल्या विचारधारा, पवित्र, अपवित्रतेच्या संकल्पना यांच्या विरूध्द बंड करून पावित्र्याच्या बिनबुडाच्या कल्पनेला विरोध केला.

**महात्मा बसवेश्वरांचे स्त्री विषयक विचार**

यत्रनारी पुजंती, तत्र देवता रमंति- जेथे नारीची पूजा केली जाते म्हणजेच तिचा सन्मान केला जातो तेथेच परमेश्वर रममाण होतो ही खरी भारतीय संस्कृती आहे. मात्र तिची उपेक्षा करणारे तिला तुच्छ लेखणारे तिचा परोपरीने तिरस्कार करणारे साहित्य आमच्याकडे निर्माण झाले. परिणामी समाजातील स्त्रीयांकडे पाहण्याचा निकोप दृष्टिकोन दुषित झाला हे सामाजिक वास्तव पुरूष प्रधाण संस्कृतित पाहवयास मिळत होते. या पुरूष प्रधान संस्कृतिच्या ऐतिहासीक पार्श्वभूमिवर १२ व्या शतकात मानवतावादी संत बसवेश्वर आणि त्यांच्या अनुयायांनी स्त्री पुरूष समानतेची उदघोषणा केली आणि तिचा सन्मान केला. स्त्रियांकडे दुषित नजरेने पाहणाऱ्या समाजाला

कामिनीमाया आहे म्हणतात, नाही ती माया नाही
कणक माया आहे म्हणतात, नाही ती माया नाही

अशा प्रकारची रचना करून स्त्रियांकडे पूर्वग्रह दुषित दृष्टिने पाहण्याच्या प्रवृत्ति विरूध्द संत बसवेश्वरांच्या अनुयायांनि मोठा प्रश्न निर्माण केला आहे. स्त्रियांमध्ये असणारी किर्ती, स्मृती, धृती आणि क्षमा मीच आहे असे भगवान श्रीकृष्ण गितेत सांगतात. मात्र याच स्त्रीला कसल्याही प्रकारचे स्वातंत्र्य देण्याची आवश्यकता मनुला वाटली नाही. समाजातील सनातनी आणि प्रतिगामी विचार करणाऱ्या व्यवस्थेने स्त्रियांना नेहमीच दुयम स्थान दिले. यांच्या विरूध्द आपल्या कृतीतून आणि उक्तीतून विचार प्रस्तुत करून महात्मा बसवेश्वरांनी नेहमीच स्त्रियांच्या अस्तित्वाचा आणि त्यांच्याकडे मानवतावादी भूमिकेतून पाहिले आहे. 'मनुवादी परंपरेने स्त्रीयांच्या पायात परंपरेच्या बेड्या टाकून त्यांच्या नशिबी जनावराप्रमाणे केवळ माद्यांचे जीवन आणले होते. परंपरागत समाजात स्त्री ही परमार्थ मार्गातील धोंड, मोक्ष प्राप्तीतील अडचन समजली जात होती.[२] अशा कालवंडात महात्मा बसवेश्वरांनी १२



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

183

व्या शतकात स्त्रियांना अनुभव मंडपाच्या व्यापक व्यासपीठावर आणून त्यांच्या पायातील कर्मकांडाच्या बेड्या तोडण्याचे महत्वाचे कार्य केले. हे त्यांचे कार्य चिरंतन लक्षात राहण्यासारखे आहे.

स्त्रियांनी उद्योग आणि व्यवसाय करावा हा विचार अनुभव मंडपाच्या माध्यमातून महात्मा बसवेश्वरांनी प्रथम दिला तर स्त्रियांना काव्यात्म अभिव्यक्ति करण्याचे आत्मिकबळही बसवेश्वरांनी आपल्या विचारातून सातत्याने दिले. महात्मा बसवेश्वरांच्या स्त्री विषयक कार्यातील आणखी एक महत्वाचा विचार म्हणजे १२ व्या शतकात त्यांनी विधवांच्या पुर्नविवाहाचा क्रांतिकारक विचार मांडला. आपल्या संस्कृतिमध्ये दुर्दैवाने एखाद्या स्त्रीच्या नशिबी वैधव्य प्राप्त झाले तर त्यांच्याकडे सहानभूतीने पाहिले जात नव्हते. शुभकार्यात त्यांची प्रतारणा केली जात होती. एकप्रकारचे मृतवत आयुष्य त्यांच्या वाट्याला येवू पाहत होते. अशाकाळात 'लिंगायत धर्मात विधवा मुक्तपणे विवाह समारंभात किंवा धार्मिक विधीमध्ये आत्मविश्वासाने सहभागी होवू शकतात'.[३] लिंगायत संस्कृतिमध्ये विधवांना अपवित्र किंवा अस्पृश्य मानले नाही तसचे पति निधनानंतर केषवपन, सती जाणे याप्रकारांना अजिबात मान्यता नाही. पुरूष जर पत्नीच्या निधनानंतर पुर्नविवाह करू शकतात तर स्त्रियांनी सुरक्षिततेपासून का वंचित रहावे अशी भूमिका महात्मा बसवेश्वरांनी अनेक वचनातून केली आहे.

भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रियांचे वस्त्र, अलंकार, हळदी कुंकू यासारख्या घटकांना अनन्यसाधारण महत्त्व दिलेले आहे. सौभाग्यवती स्त्रिने हे सर्व अलंकार परिधान केले असतील आणि ती पती प्रेमापासून वंचित असेल तर या अलंकारांना मूल्य राहत नाही. याचा अर्थ या सौभाग्य सवंर्धक गोष्टितून तिला मिळणाऱ्या आंनदात काही उणे पणा राहतो. तिच गोष्ट संत बसवेश्वर परेमश्वर आणि भक्त यांच्यातील आहे असे मानतात. ज्या समाजात स्त्रियांचा सन्मान केला जातो. निर्णय प्रक्रियेत तिला स्थान दिले जाते तिच्या बौध्दिक आणि शारीरिक सामर्थ्याला महत्त्व दिले जाते त्या समाजाचा विकास निश्चितपणे ठरलेला असतो. ही भावना संत बसवेश्वरांनी आपल्या वचनातून व्यक्त केली आहे.

**सामाजिक प्रबोधनवादी विचार**

सामाजिक समता आणि विश्वबंधुता यांचा पुरस्कार करून समाजात सामाजिक स्वास्थ्य निर्माण करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करणारा एक महात्मा म्हणून बसवेश्वरांकडे पाहिले जाते. १२ व्या शतकात समाज अनेक बुरसटलेल्या विचारांनी ग्रासला होता. श्रध्दा, अंधश्रध्दा, जातीवर्ण व्यवस्था, अविचारीपणाने साधलेले धर्माचरण यासारख्या घटकांमुळे समाजाचा आणि व्यक्तिगत पातळीवर प्रत्येक माणसाचा मानसिक आणि बौध्दिक विकास थांबलेला होता. हा विकास पुन्हा एखदा प्रस्थापित करावयाचा असेल तर समाजाला प्रबोधनाची नितांत गरज आहे याची जाणीव संत बसवेश्वरांना प्रकर्षने झाली म्हणूनच त्यांनी आपल्या कृतीबरोबरच अनेक वचनांतून सामाजिक समतेचा पुरस्कार केला आहे.

मनुष्याची उक्ती आणि कृती, आचार आणि उच्चार यामध्ये एकवाक्यता नसेल तर बहुतेक वेळा विसंगतीचाच अनुभव येतो. हे सांगताना संत बसवेश्वर म्हणतात

टाकिला जो शस्त्र खाली, अन मारी तो गप्पा वीरव्रताच्या,



ISSN No. 2319-6025

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya

184

शोभेल का ती भाषा त्याला?
न ठेविली श्रध्दा देवावरी, अन् करी बोध आत्मज्ञानाचा,
शोभेते का ते त्याला ?[४]

ज्याप्रमाणे रणभूमीवर लढण्याची मानसिकता हारवून बसलेल्या योध्याने हातातील शस्त्र खाली टाकले आणि वीरश्री च्या गप्पा मारू लागला तर ते त्याला शोभून दिसणार नाही. परमेश्वरावर श्रध्दा न ठेवणाऱ्या भक्तास आत्मज्ञानाच्या गप्पा शोभून दिसत नाहीत, आपला जीवनसाथी असणाऱ्या पतीचा त्याग करणाऱ्या स्त्रिच्या कपाळावर सौभाग्य अलंकार असलेले कुंकू शोभून दिसत नाही. नास्तिकाच्या तोंडी देवाच्या गोष्टी म्हणजे खरे तर माकड चेष्टाच असते, आणि दुष्ट आचार हाच ज्यांचा शिष्टाचार झालेल्या असतो त्यांना सदाचार कधीच चांगला दिसत नाही किंवा जो परमेश्वरावर श्रध्दा ठेवत नाही. त्याला परमेश्वर आपलासा कसा करील ? अशा प्रकारचा लोकजीवनातील प्रतिमांचा वापर करून संत बसवेश्वरांनी समाजातील प्रत्येक माणसाची उक्ती आणि कृती, आचार आणि विचार यांच्यात एकवाक्यता असावी, असा विचार अग्रही स्वरूपात मांडला आहे.

सदाचार हा श्रेष्ठ माणसाचा सर्वोच्च अलंकार आहे. कोणत्याही कृतीतून आर्थिक लाभ व्हावा हे मानवी जीवनाचे उद्दिष्ट आहे. त्यासाठीच तो अनेक मार्गाचा अवलंब करतो, अनेक प्रकारचे व्यवसाय, उद्योग याचा आधार घेतो अर्थात कोणत्याही प्रकारचा लाभ घेण्याचे उद्दिष्ट वाईट नसते मात्र त्याचा अतिरेक झाला तर मात्र 'अति तेथे माती' या न्यायाने निराशेलाच सामोरे जावे लागते. म्हणून संत बसवेश्वर एका वचनात म्हणतात 'वाढत्या लाभाची नको आशा, येईल अनुभवा उरी निराशा'

उचित आणि योग्य प्रकारच्या लाभ घेणे हे अर्थातच मनुष्याच्या वृत्तीतील सद्गुण. मात्र एखादा दीन, दुर्बल, गरीब, गरजू मनुष्य जेंव्हा तुमच्या दारी येईल तेंव्हा त्याच्याशी तुमचे वर्तन सौजन्याचेच हवे. त्याच्या मदतीला धावून जावून तुमच्या हातून त्या दीनासाठी थोडासा दान, धर्म झाला तर त्यासारखा दुसरा आनंद नाही. जीवनात कोणताही आणि कितीही कटू प्रसंग आला तरीही आपले बोलणे सत्यच असले पाहिजे, असत्याचा संगच मुळी नको. खोटे आचरण आणि दुराचार यापासून दूर राहणे हा जगण्याचा नियम व्हावा. मित्रहो कष्ट हे कितीही त्रासदायक असले तरीही त्याचीच कास धरून आपला आचार हा सदाचार असला पाहिजे. तेच मूल्य श्रेष्ठ, सदाचार हाच एक सर्वांसाठी जगण्याचा राजमार्ग व्हावा. त्यातच खरे तर माणसाचे आणि समाजाचे हीत लपले आहे.

**संदर्भ**

१. मेनकुदळे अशोक – क्रांतिकारी युगपुरूष महात्मा बसवेश्वर, प्रकाशक–महाराष्ट्र बसव परिषद, चतुर्थ आवृत्ती, पृ.२९
२. मेनकुदळे अशोक – क्रांतिकारी युगपुरूष महात्मा बसवेश्वर, प्रकाशक–महाराष्ट्र बसव परिषद, चतुर्थ आवृत्ती, पृ.११३
३. डॉ.ईश्वरन के.– रिलिज ॲण्ड सोसायटी, अमंग दी लिंगायतस ऑफ साउथ इंडिया, पृ.१३
४. जुबरे राजू – शरण जीवन दर्शन, महाराष्ट्र बसव परिषद, दुसरी आवृत्ती २०१६

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh, Pune-67



185

Scanned with CamScanner